'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 2 Issue. 2
ISSN :2348-7143 (Online)
April- June- 2015

# स्त्री शक्तीचे बदलते स्वरूप : काल, आज आणि उद्या

**प्रा. डॉ. के. पी. सरोदे**
**अर्थशास्त्र विभाग,**
**श्री. व्ही. एस. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**रावेर जि. जळगाव (महाराष्ट्र)**

***महिला सक्षम समर्थ असेल तरच संपूर्ण कुटुंब सुखी सक्षम होऊ शकते. महिला दबावात असेल तर संपूर्ण कुटुंबाची दैना होते. तेच समाजाच्या बाबतीत खरे आहे. जिथे निम्मे समाज अशा दबावाखाली परस्वाधीन जीवन जगतो आहे. तिथे एकूण जीवन चांगले असण्याची फारशी शक्यता नाही. ग्रामीण समाजाच्या बाबतीत तर हे अधिकच खरे आहे. शिक्षणाची दु:स्थिती, अपुरा आहार, अकाली लग्ने आणि बाळंतपण, आरोग्याची धड सोय नाही. दिवसरात्र कष्ट, बाजारपेठ आणि सत्ता राजकारण यांपासून अद्याप वंचित या सर्वात घेरली गेलेली महिला त्या संपूर्ण समाजाच्याच दु:स्थितीचे एक कारण आहे.***

वेदकाळातील काही ग्रंथावरून स्त्रियांविषयी माहिती कळते. आठव्या वर्षी मुलीची मुंज होत असे. ती गुरूगृही शिकण्यासाठी जात असे. ती सोळा वर्षाची झाली की तिचा तिच्या मतानुसार विवाह होई. जर एखादीस पंडिता, ब्रम्हवादिनी व्हायचे असेल तर ती शिकत राही. स्वत:चे गुरूकुल काढून इतरांना विद्या देई. अपाला, घोषा, अरुंधती, मैत्रेयी अशा अनेक शिकलेल्या महिलांचा उल्लेख ग्रंथातून मिळतो. हळूहळू भारतावर बाहेरून हल्ले होऊ लागले. बाहेरच्या देशातून अनेक टोळया आल्या, लढाया होऊ लागल्या, त्यात शत्रुच्या स्त्रिया पळवून नेत. त्यांचा छळ करीत. स्त्रियांना घरात बुरख्यात ठेवण्याची चाल रूढ झाली. आठव्या वर्षी लग्न करून देत. समाजातील पुरूषांच्या मनातील स्त्रीबद्दलचा आदर कमी होत गेला. आई होण्याचा नैसर्गिक शक्तीचा मान समाजातून कमी झाला. समाज तिला `आई नाही तर बाई` म्हणू लागला. मग हुंड्याची रीत बोकाळली. मुलींना मारून टाकण्याची चाल, बायकोला मारणे, अनेक विवाह करणे, अनेक चालीरीती सुरू झाल्या. विधवा स्त्रियांना विद्रुप करून तिला अपशकुनी मानण्याची पध्दत रूढ झाली.

प्राचीन भारत असो वा अर्वाचीन आणि आजच्या वर्तमानातील भारत असो, स्त्री हा मापदंड लावला तर गर्वाने मान ताठ व्हावी असे काही दिसत नाही. मुळातच येथे स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन काय ? तर मानव कुळातील योग्य आणि उपयुक्त प्राणी, येथे सरस्वती ही विद्येची देवता, लक्ष्मी ही धनाची देवता आणि दुर्गा ही शक्तीची देवता म्हणून गौरविली जाते. आणि स्त्रीला सोयीनुसार पुज्य मानून अगदी देवता स्वरूप ठरवून एक तर देव्हाऱ्यात बसविले जाते किंवा सोयीनुसार पायाची दासी बनवून पादत्राणाचे मोल तिला दिले जाते. ती एक मालकी हक्काची वस्तू म्हणून तिला पणालाही लावले जाते आणि तसे तिला पणाला लावणाऱ्या तिच्या पतीला येथे धर्मचारिणी म्हणून गौरविलेही जाते. `देव आणि दासी` या दोन टोकांत स्त्रिला स्थान देण्याऐवजी जर तिला `मानव` हे स्थान दिले तरच स्त्रीवरील अन्याय दूर होईल. देवी म्हणून दैवतीकरणही तिला नको आणि संतती निर्माण करण्याचे हक्काचे साधन, भोग्य अशी दासीही तिची दैन्यावस्थाही तिला नको. भारतात आर्यांच्या आगमनपूर्वी असलेल्या आर्येतर संस्कृतीत काहीसे बरे स्थान येथील स्त्रिला होते. पण स्मृतीकारांनी स्त्रीच्या बाबतीत दुहेरी निती निर्धारीत केली.

शतकानुशतके स्त्रियांना सार्वजनिक जीवनातल्या अनेक क्षेत्रापासून दूर ठेवण्यात आले. त्यांना ज्या वेळेस शिक्षण मिळाले, समाजात वावरण्यास वाव मिळाला तेव्हा प्रस्थापित ज्ञान आणि विचार या बाबी त्यांना खटकू लागल्या. नव्या गोष्टी घडविण्याची उर्मी त्यांच्या मनात उफाळली. कधी त्यांना जुन्या मांडणीतही नवा आशय दिसू लागला. स्वत:ची निजखूण शोधतांना स्त्रीवादाची विचारधारा आकारली. `स्त्री अभ्यास` नवीन ज्ञानभाषा उदयास आली. परंपरेने

लादलेल्या चौकटीच्या पलीकडे जाऊन स्त्रीत्वाचा शोध स्त्री आता करू लागली आहे. पण आजच्या स्त्रीपुढचे प्रश्न संपले म्हणावेत अशी परिस्थिती नाही. जुने प्रश्नही कायम आहेत आणि नवे प्रश्नही उभे राहताहेत. स्त्रियांशी संबंधित असलेले प्रश्न वा आव्हाने मोठ्या संख्येने जाणवतात. हुंडा, हिंसा, बलात्कार हे प्रश्न संपलेले नाहीतच. स्त्रीचा स्वतःच्या शरीरावरचा हक्क आजही नाकारला जातोय. स्वतःला किती मुले व्हावीत याबद्दल आजही स्त्री निर्णय येऊ शकत नाही. धर्म आणि जात या क्रुरपट्टा वापरून पुरूषसत्ताक राजकारणाने स्त्रियांमध्ये पूर्वीपासूनच फुट पाडली आहे. स्त्रीवाद हा मुठभर स्त्रियांचा मामला आहे. असा समज पसरवण्याचे प्रयत्न होत आहेत. महिला आरक्षणाच्या मुद्याला यामुळेच पिछाडी मिळत आहे. महिलांचे सबलीकरण हा परवलीचा शब्द मानला गेलाय. पण हे फसवे जाळे आहे. स्त्रियांना भूल धापा देवून प्रत्यक्षात त्यांच्या पदरात काहीच माप न टाकण्याची शक्यता यात अधिक आहे. धर्माच्या नावाखाली, संस्कृती रक्षणाच्या नावाने स्त्रियांवर दहशत बसवण्याचे प्रमाणही वाढत आहे. चंगळवाद आणि भोगवादाचा विखळा पडला असून त्यात स्त्री ही सापडत आहे. जाहिराती, फॅशन शो, सुंदरी स्पर्धा अशा माध्यमातून स्त्रीचा व्यापार चालला आहे. आणि स्त्री ती स्वखुशीने होऊ देतेय. विज्ञानाचा विधायक वापर न होता स्त्री जन्मालाच घातक असे उपचार विज्ञानाच्या आधारे केले जात आहेत. गर्भजल चिकित्साद्वारा लिंग निदान, स्त्री गर्भाची हत्या हे प्रकार उद्विग्नता आणणारे आहेत. जागतिकीकरणाने उभ्या केलेल्या प्रश्नांची झळ स्त्रीला सर्वाधिक पोहचत आहेत. खाजगीकरणाचाही तडाखा स्त्रीला सोसावा लागतोय. यामुळेच गरीबीचे स्त्रीकरण झाले आहे. हिंसेचा उद्‌भव सर्वच देशातून वाढला आहे. स्त्रियाही हिंसेची शिकार ठरत आहेत. क्वचित या स्वतःही हिंसाचार करत आहेत.

प्राचीन व मध्ययुगीन भारतीय स्त्रीपेक्षा आजची भारतीय स्त्री निश्चित सुधारणांच्या वाटेवर आली आहे. पण कित्येक बाबतीत `सुधारणा` हा शब्द व तद्वविषयक कायदे पुस्तकांत राहिले आहेत. उक्ती व कृती यात आजही तफावत राहिली आहे. आजही कित्येक भारतीय स्त्रियांना पतीचे अत्याचार, दहशत व छळ सहन करावा लागत आहे. दाद मागण्यासाठी न्यायालयाची दारे ठोठावी लागत आहेत. शिक्षणाचा अभाव, जाचक रूढी आणि चुलखंडाचे दुय्यम नागरिकत्व स्त्रीच्या विकासात आजही अडथळे आणत आहे. म्हणजे अजून भारतीय स्त्री अबला रूपातून सबला व्हायची आहे.

जगात कोठेही न आढळलेली पण भारतात सर्रास दिसणारी गोष्ट म्हणजे महिलांचे कुपोषण खेडोपाडी महिलांचे वजन सरासरी चाळीस किलोच्या आसपास भरते. कष्टापुरते शरीर, चारा-जळणाचे भारे घेऊन - घागरी - हंड्याचे ओझे घेऊन त्या रोज मैलान् मैल चालतील. पण भारतीय महिलेचा आहार नावालाच `उरले सुरले बाईला` हा प्रकार. स्वयंपाकाची तऱ्हाच अशी की तासन् तास रांधत बसायचे. पोळया लाटा, भाकरी थापा, मंडळी जेवून उठताहेत, शेवटी वेळ येईल बाईची-मुलीची

रांधू - वाढून दमली, बाई उपाशी निजली
दुड्डी भगोणी रिकामी, बाई उपाडशी निजली

घराघरापर्यंत असे दृश्य दिसते. गाई-म्हशीचे दूध कमी पडेल म्हणून त्यांना रानावनात वाऱ्यासाठी कष्टवणे, तोटयाचे, पण महिलांच्या कष्टाचा हिशेब अजून लागायचा आहे. खायला प्यायला कमी मिळणे हा केवळ एक परिणाम आहे. पाणी, स्वच्छतागृहे यांच्या गैरसोयी, पाणी भरून आणावे लागत आहे. अशी किती तरी गावे आहेत. तीन तीन हांडे तोलत जाणाऱ्या महिला आहेत. पाणी भरण्याची जबाबदारी सगळी महिलांची, स्वच्छतागृहे नसणे. महिलांना तर पहाटे किंवा मावळल्यावरच जावे लागते. वाहनांचा प्रखर प्रकाशझोत जवळ आला की रस्त्याच्या कडेला बसलेल्या महिलांना गपकन उठावे असे चित्र आहे. महिलांना सुखदुःखाचे बोलण्यासाठी जागा नाही. त्या अशा ठिकाणाचा वापर करतात. खाणे-पिणे-

झोपणे मल विसर्जन वगैरे प्राणी जीवनातील कर्तव्ये - सुखे एकविसाव्या शतकातही महिलांना धड मिळत नाहीत. कितीतरी महिला अडलेल्या बाळंतिणी, रक्तस्राव, आडवे मुल, असे काहीतरी कधी बैलगाडी, कधी पाठंगुळी, कधी ट्रक टेम्पो - जीपमध्ये तर काही वाटेवरच बाळंत होतात. खेड्यातील सत्तर टक्के बाळंतपणे घरी होतात. बहुतेकांना खर्च परवडत नाही. म्हणून भारत सरकारची सोय तिथपर्यंत पोहोचत नाहीत. केवळ यातल्या शेकडो पाच दहा बाळंतपणांना नर्सबाईचा हात लागतो. उरलेल्या शेजारणीच्या किंवा दाईच्या भरवश्यावर. बहुतेक बाळंतपणे पावसाळयात रात्री वीज असेल, नसेल, वाहन असेल नसेल, सरकारी योजनेतील `सुरक्षित मातृत्व`, `कौटुंबिक आरोग्य`, `सुरक्षित संबंध` निरनिराळया नावांनी हे कार्यक्रम पन्नास वर्ष चालू आहेत.

महिला सक्षम समर्थ असेल तरच संपूर्ण कुटुंब सुखी सक्षम होऊ शकते. महिला दबावात असेल तर संपूर्ण कुटुंबाची दैना होते. तेच समाजाच्या बाबतीत खरे आहे. जिथे निम्मे समाज अशा दबावाखाली परस्वाधीन जीवन जगतो आहे. तिथे एकूण जीवन चांगले असण्याची फारशी शक्यता नाही. ग्रामीण समाजाच्या बाबतीत तर हे अधिकच खरे आहे. शिक्षणाची दु:स्थिती, अपुरा आहार, अकाली लग्ने आणि बाळंतपण, आरोग्याची धड सोय नाही. दिवसरात्र कष्ट, बाजारपेठ आणि सत्ता राजकारण यांपासून अद्याप वंचित या सर्वात घेरली गेलेली महिला त्या संपूर्ण समाजाच्याच दु:स्थितीचे एक कारण आहे. मुस्लिम महिलांच्या ज्वलंत समस्य व त्यांच्या मागासलेपणाच्या, गरीबीच्या, सामाजिक आणि राजकीय उपेक्षांच्या समस्या आहेत. म्हणूनच कुपोषणामुळे आणि कुटुंबनियोजनाच्या अभावामुळे कष्टकरी आणि कनिष्ठ वर्गातील जमातीतील मुस्लिम महिलांचे आरोग्य किमान पातळीवरील दिसून येते. प्रसुती काळातील मृत्युचे प्रमाण फार मोठे आहे. या प्रवर्गातील मुस्लिम महिला निस्तेज, क्षयरोगसदृश्य, रक्ताक्षयाने ग्रस्त दिसून येतात. त्याच्या आरोग्याची पोषणाची आणि शिक्षणाची समस्या आहे. या त्यांच्या भयानक परिस्थितीकडे कोणाचे लक्षच नाही. याच गटातील तलाकपीडित महिलांना कसलेही संरक्षण किंवा साहाय्य मिळत नाहीत. त्यांच्या संरक्षणासाठी अन्य कोणतीही व्यवस्था नसते. तोंडी तलाकच्या प्रथेच्या गैरफायदा घेणारे मुस्लीम पुरूष हुंड्यासाठी पत्नीला जाळणाऱ्या पुरूषांच्या मानसिकतेचे असतात. मुस्लीम महिलांना धर्माने वारसा हक्क, संपत्तीचे अधिकार हे मुस्लीम धर्मगुरूंना हाताशी धरून पुरूषसत्ताक व्यवस्थेने काढून घेतलेले आहेत. मुस्लीम महिला त्याच वर्गातील हिंदू महिलांपेक्षा एका पायरीने प्रत्येक बाबतीत मागे आहे. तिचे शोषण, दु:ख आणि तिच्यावर होणारे अत्याचार हे भारतीय समाजसेवेचा एक भाग आहेत. तथाकथित हिंदू महिलांची परिस्थिती मुस्लीम महिलांपेक्षा फार वेगळी नाही. आदिवासी महिलेची ही स्थिती इतरांच्या दृष्टीने अतिशय दयनीय आहे. कामाच्या ओझ्याखाली ती दबलेली आहे. दारिद्रयरेषेच्या खाली तिचे राहणीमान आहे. आधुनिक विजेच्या उपकरणांशी तिचा संपर्क जवळ जवळ नाहीच. आदिवासी महिलेची अशी अवस्था असली तरी रानावनातील कामे करताना ती स्वच्छंदपणे गाणेही गुणगुणते. आपल्या दयनीय अवस्थेची जणू जाणीवही नाही. आदिवासी महिला कष्टाळू, कामसू, प्रामणिक आहे. तशी ती आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहे. म्हणून आदिवासी समाजात इतर समाजापेक्षा महिला पुरूष समानता अधिक आहे.

महिलांमधील आत्मसन्मानाची भावना वाढावयाला, सुधारणा खूपच कारणीभूत झाल्या. पुढील काळात साहित्य, संगीत, कला, क्रिडा, शिक्षण, शास्त्रीय संशोधन या क्षेत्रामध्ये महिलांनी जी झेप घेतली ती कौतुकास्पद आहे. व्यवसायानुरूप त्यांचा शेतकरी - शेतमजूर, कामगार, कर्मचारी यांच्या लढ्यातील सहभाग खूपच वाढला.

स्त्री शिक्षणाचे मन्वंतर झाले. महिलांच्या भावविश्वाच्या कक्षा रूंदावल्या, आपले सहजीवन, स्त्री-पुरूष नाते, आपल्या भावना त्या साहित्यातून प्रकट करू लागल्या. मनोरमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरी, संजीवनी मराठे, इंदिरा संत, शांता शेळके, पद्मा गोळे, त्यानंतरच्या पिढीत स्त्रीत्व त्याची दैहिक बाजू, बदलत्या लौकिक

ISSN :2348-7143 (Online)
April- June- 2015

भूमिका, त्यांची स्वप्ने, वास्तव हा आशय, अत्यंत पारदर्शकपणे प्रकट झालेला दिसतो. हेमा लेले, संजीवनी खोले, अंजली कीर्तने, प्रभा गणोरकर, कल्याणी इनामदार, अरूणा ढेरे, सिसिलिया कार्व्हालो यांनी महिलेच्या अस्तित्वाचे भाव प्रकट केले आहे. गोष्टी वेल्हाळपण हा महिलांचा मुलभूत धर्म आहे. कथेच्या क्षेत्रात महिलांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. वामनसुता, शिवतनया, ताराबाई तर्खड, गिरिजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के, समाजाचे झपाट्याने परिवर्तन झाले व त्याचे पडसाद कथेत उमटले. कमला फडके, स्नेहलता सिनूरकर, योगिनी जोगळेकर, सुमती क्षत्रैमाडे, विजया राजाध्यक्ष, वसुधा पाटील, विशाखा पुरंदरे, आशा बगे, रेखा बैजल, नव्या स्त्रीच्या जाणीवांचा थेट व आक्रमक अविष्कार त्यांच्या लेखनात आढळतो. कादंबरी बाबत इंदिराताई सहस्त्रबुध्दे, आनंदीबाई जयवंत ह्या पहिल्या पिढीतील लेखिका होत्या. त्यानंतर कुमुदिनी प्रभावळकर, विभावी शिरूरकर, गीता साने, मालतीबाई दांडेकर, नलिनी मुळगावकर, सरोजिनी बाबर, या सर्व लेखिकांच्या आशयाचे विश्व स्त्रीजीवन विशिष्ट प्रश्नांनीच व्यापलेले आहे. स्त्री जीवनातले परिवर्तनाचे चित्र स्पष्ट उमटले आहे. ऐतिहासिक कादंबरी अथवा प्रादेशिक कादंबऱ्या पासून मात्र लेखिका दूरच राहिलेल्या दिसतात हे प्रामुख्याने जाणवते. आत्मचरित्राबाबत रमाबाई रानडे, बाया कर्वे, लीलाबाई पटवर्धन ह्यांनी पतीचा गौरव करण्यासाठीच आत्मचरित्र लिहिलेले आढळते. मल्लिका अमर शेख, माधवी देसाई, कांचन घाणेकर, दुर्गा खोटे, कमला पाध्ये, सुनीता देशपांडे, शांताबाई कावळे, सिंधुताई सपकाळ यांच्या आत्मचरित्रात निराळेच आत्मभान आहे.

या शतकातील गेली सात दशकं बोलक्या रूपेरी पडद्याची आहेत. भारतीय महाकाव्यानं खूप कथा दिल्या. सुरूवातीला पुराणकथाच्या आधारे चित्रपट उभे राहिले. सती सावित्री, सती सुलोचना, रामायण, शकुंतला, अनुसया, अहिल्या त्यानंतर अरबी कथेच्या चित्रपटाची सुरूवात अनारवाला, बुलबुल-ए-परिस्तान, फेअरी ऑफ सिंहलदीप त्यानंतर पोषाखी, पौराणिक, काल्पनिक चित्रपट पडद्यावर आलेल्या महिला प्रतिमांचा विचार केवळ मनोरंजनासाठी करावा असं घडलं. कृष्णा कुमारी, जुबेदाबानू, शांताकुमारी, अमीर बेगम, दुर्गा खोटे, ललीता पवार, शोभना समर्थ त्यानंतर सामाजिक विषयाचे चित्रपट सुरू झाले. त्यात वनमाला, मुमताज रेहाना, नलिनी जयवंत, ह्या स्त्री सौंदर्य वैशिष्ट्यपूर्ण असं सौंदर्य घेऊन आल्या होत्या. त्यानंतर मधुबाला, हेमा मालिनी, करिश्मा कपूर, उर्मिला मातोंडकर अशा चित्रतारका आल्या. जीवनशैली घडवण्याचं सामर्थ्य जिच्यात असतं, घराचं घरपण पेलण्याचं आव्हान जिच्यात असतं, तीच महिला समाजात, घरात आपल्या जाणिवा हरवून बसण्याचं दृश्य दिसत आहे. झपाटयानं बदलत्या सामाजिक मूल्यांशी सामना करताना ती भांबावलेली आहे, बावरलेली आहे. कदाचित म्हणूनच आपलं स्थान तिनं पक्कं केलेलं नाही. याचच प्रतिबिंब चित्रपटातल्या प्रतिमांत दिसतं.

स्त्री शिक्षणाचा विस्तार राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. ॲनी बेझंट, पंडित रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, शाहु महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आचार्य बिनोबा भावे, शिक्षण क्षेत्रात महिलांन कामगिरी करायची झाल्यास मुळांत महिलांनी शिक्षण घेतले पाहिजे हा विचार त्यांनी रूजवला. चेन्नई येथे भगिनी सुब्बालक्ष्मी, मुंबई प्रांतात बेगम जंजीरा जोहरा फौजी यांनी मुस्लीम मुलींसाठी शिक्षण संस्था काढली. सावित्रीबाई फुले नंतर पंडिता रमाबाई सरस्वती, ताराबाई मोडक, मनुताई वाघ, गंगुताई पटवर्धन, डॉ. चित्रा नाईक, शकुंतला परांजपे, निर्मलाताई पुरंदरे, रेणू दांडेकर अशा या ख्यातनाम महिला ज्या शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या आहेत. त्या महिलांच्या कामगिरीमुळे शिक्षण क्षेत्रावर निश्चित ठसा उमटला आहे. शिक्षण क्रांतीमध्ये त्या तेज:पुंज प्रकाशझोत म्हणून झळकत आहेत.

अगदी अलीकडच्या काळापर्यंत विज्ञानाच्या क्षेत्रात महिलांचा सहभाग खूपच कमी प्रमाणात होता. यशस्वी संशोधकांमध्ये बार्बारा मॅकक्लिंटॉक सारख्या स्वतंत्रपणे काम करणाऱ्या आणि मेरी क्युरीसारख्या आपल्या पतीसमवेत

काम करणाऱ्या स्त्रियांचा समावेश आहे. अतिशय हुशार आणि अभ्यासू मुली सर्वत्र चमकत असतात. गुणवत्ता याद्यांवर नुसती नजर टाकली तर हे सहज लक्षात येते. मुली अनेक विषयात प्राविण्य दाखवित आहे आणि त्यातील काही पीएच. डी. पर्यंत शिकत आहेत. संशोधन क्षेत्रातही अनेक संशोधिका अतिशय चांगले काम करताना दिसतात. भारतातील पहिली महिला वैमानिक प्रेमा माथूर, भारतातील पहिली महिला रेल्वे ड्रायव्हर सुरेखा भोसले, भारतातील पहिली महिला पोस्टमन कौशल्या खोब्रागडे, इंग्लिश खाडी पोहून जाणारी पहिली भारतीय महिला आरती शहा, दक्षिण गंगोत्रीवर पाऊल टाकणारी पहिली भारतीय महिला आदिती पंत, महिला धावपटू पी. टी. उषा, डॉक्टर आनंदीबाई जोशी आज स्त्रीला चांगल्या समृध्द जीवनाची स्वप्नं पाहण्याचं धैर्य येत आहे. अवकाशात झेप घेणारी पहिली भारतीय महिला कल्पना चावला असो की, जमिनीवरील स्त्रियांची, मुलांची कणवं घेऊन त्यांना मार्ग दाखविणारी सुधा नारायण मुर्ती असो वा अमेरिकेत स्थायिक होऊन तिथल्या राजकारणात भाग घेऊन डेमोक्रेटिक पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेली नागपूरची स्वाती दांडेकर असो, संधी मिळताच त्यांनी स्त्रीचं कर्तृत्व सिध्द केलं.

देशाच्या लोकसंख्येच्या पन्नास टक्के हिस्सा असलेल्या या वर्गाला सत्ता आणि निर्णय प्रक्रियेत अपेक्षित स्थान मिळाले नाही. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत महिलांनी हिरीरीने, एवढेच नव्हे तर पुरूषाच्या बरोबरीने भाग घेतला. सरोजिनी नायडू, अरूणा असफअली, सत्तांतर झाल्यानंतर राष्ट्रीय राजकारणातील महिलांची संख्या कमी झालेली दिसते. इंदिरा गांधी यांचे अनन्यसाधारण कर्तृत्व वगळता अन्य कुणाही महिलेची राष्ट्रीय राजकारणावर छाप दिसत नाही. आजच्या घडीला राष्ट्रीय राजकारणात ज्या महिला आहेत त्यापैकी बहुसंख्य या ना त्या रूपाने राजकीय कुटुंबाशी संबंधित आहे. तर काही स्वतःचे कर्तृत्व, धडाडी यांच्या बळावर राजकारणात आलेल्यांमध्ये कै गीता मुखर्जी, ममता बॅनर्जी, भगवती देवी त्याशिवाय तत्कालीन राजकीय परिस्थितीनुसार आपले कर्तव्य दाखवून मृणाल गोरे, प्रमिला दंडवते, सुषमा स्वराज, सुमित्रा महाजन, जयवंतीबेन मेहता ह्या राजकारणांत सक्रीय दिसता आहेत. चित्रपट तारीका राजकारणात मोठया प्रमाणात दिसतात. जय ललिता, नर्गीस, वैजयंती माला, जयाप्रदा, शबाना आझमी, जया बच्चन आपल्या लोकप्रतिनिधीत्वाचा सदुपयोग करावी ही लोकांची अपेक्षा अवाजवी ठरू नये.

आज स्त्रीला चांगल्या समृध्द जीवनाची स्वप्नं पाहण्याचं धैर्य येत आहे. हे चित्र उल्हासकारक आहेच. तरूण मुली बुध्दीबळ असो, वेटलिफ्टिंग असो, नेमबाजी, खगोल, ऑलिम्पिक, एशियाड असो, सामाजिक बंधनं उल्लंघून पुढे जात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात घटनेनं महिलेला समान हक्क, समान दर्जा दिला आणि तिचं कार्यक्षेत्र आणखी बहरलं, फुलत राहिलं. अगदी लिपिकापासून थेट न्यायाधिशापर्यंत, जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी, अभियंत्या अशा विविध जागी महिला दिसू लागल्या आहेत. आज बदलत्या काळात जाहिरात क्षेत्र, फॅशन डिझायनिंग, दिग्दर्शन, मॉडेलिंग अशा विविध क्षेत्रात महिला आपली नाममुद्रा उमटवतांना दिसत आहेत. गणितज्ञ ॲडा बायरन, कच्च्या पक्क्या मडक्याचा विवेक सांगणारी मुक्ताबाई, नवी पिढी निगुतीनं घडवणारी जिजाबाई, सेवाभावी फ्लॉरेन्स नाइटिंगेल गगनभरारीचं स्वप्नं वास्तवात आणणारी पहिली महिला वैमानिक ॲमिलिया इयहार्ट, मेरी क्युरी, मदर तेरेसा, बहिणाबाई चौधरी, किरण बेदी अशा अगणित तेवत्या ज्योती तिची वाटचाल सुकर करतील. एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर महिला तळपत राहिलेली दिसते. स्वयंप्रेरणेने, स्वयंप्रज्ञेनं, कुणी शिक्षणक्षेत्रात, कुणी सेवाक्षेत्रात, कुणी झगडते, कायदा आणि सुव्यवस्थेसाठी, कुणी चमकते आंतरराष्ट्रीय प्रांगणात खेळाडू म्हणून, अभिनेत्री म्हणून, कार्यकर्ती, पत्रकार, चित्रकार, नृत्यांगना, संगणकतज्ञ, संशोधन, प्रशासकीय अधिकारी, पंतप्रधान सुध्दा काळोख्या गर्तेतून प्रकाश किरणांच दर्शन घडण्यासाठी एकेकाळी धडपडणारी महिला आकाशात आणि अवकाशातही आज विहरते. या तिच्या गगनभरारीचा वेध घेतांना स्मरायलाच हवी तिची शतकानुशतकाची संघर्षयात्रा, वेदकाळापासून जाणवणारी तिची अस्तित्त्वाची धडपड, औद्योगिक क्रांतीने तिच्या एकंदर जीवन पध्दतीतच नवे बदल घडवून आणले. आणि स्वातंत्र्याच्या, मुक्तीच्या

चळवळीचीही नांदी ठरली. घरातच कुटुंबाच्या उस्तावारीत आयुष्य कंठणारी ती अधिकाअधिक समाजाभिमुख बनली. आपल्याला राजकीय व शैक्षणिक हक्कापासून वंचित ठेवलं जात आहे. याची जाणीव तिला तीव्रतेने डाचू लागली. तिचे हक्क मिळवून देण्यासाठी काही गट सक्रिय झाले आणि मुलींना शिक्षण, तिला मालमत्तेचा हक्क व मताधिकार हे प्रश्न ऐरणीवर आले. निरक्षरता निर्मूलन, मुलींचे शिक्षण, तिला मालमत्तेचा हक्क व मताधिकार हे प्रश्न ऐरणीवर आले. निरक्षरता निर्मूलन, मुलींचे शिक्षण हे महत्त्वाचे प्रश्न महिलांनी हाती घेतले. मुलींना विनामुल्य शिक्षण मंजूर करून घेतले. स्त्रीचे आरोग्य, बाळाचे आरोग्य यासाठी गावोगावी आरोग्य व्यवस्था, शिशु संगोपन गृहे, बालवाड्या, परिचारिका ह्या गावपातळीवरच्या सुविधा मिळवून घेतल्या आहेत. पिण्याचे पाणी, सार्वजनिक शौचकुपव्यवस्था अशा प्राथमिक सुविधा स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात प्राप्त केल्या आहेत. स्त्रियांच्या वारसा हक्कांत सुधारणा, मुलाइतकाच मुलीलाही मालमत्तेत समान हिस्सा, समान कामाला समान वेतनाचा कायदा, हुंडा किंवा अन्य कारणास्तव स्त्रीला छळणाऱ्याविरूध्द १४८ अ कलमाचा कायदा, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, बलात्काराविषयक कायद्यात सुधारणा, कौटुंबिक न्यायालये, राष्ट्रीय महिला आयोग सर्वात महत्त्वाचा म्हणजे `पंचायत राज` कायदा झाला. निर्णय प्रक्रियेत स्त्रियांना स्थान मिळण्याच्या दृष्टीने हा कायदा खेडोपाडी उपयुक्त ठरला आहे. भारतातल्या खेडोपाडीच्या लक्षावधी साध्यासुध्या स्त्रिया निर्णय प्रक्रियेत सामील होत आहेत.

आज असं कोणतंही क्षेत्र नाही की जिथं संधी प्राप्त झाल्यावर स्त्रियांनी आपलं कर्तृत्व दाखवलेलं नाही. आज लाखो स्त्रिया घरसंसार आणि आपलं व्यक्तीमत्व फुलवत आहेत. घर नि समाज फुलवत आहेत. सुजनांच क्षेत्र असो वा यंत्रांच साहित्य व स्वयंपाक आपलं हस्तलाघव स्त्रिया दाखवत आहेत. इंदिरा गोस्वामी सारखी सर्वोच्च साहित्य पुरस्कार मिळालेली स्त्री, विधवा स्त्रीचं भारतीय समाजाचं कसं शोषण आजही सुरू आले याच चित्रण करते. अपरंपार पशुहत्या अन् ती ही देवीच्या नावावर करणाऱ्या आसाममधील धार्मिक कट्टरवाद्यांशी दोन हात करते. सोनी तारापुरवालासारखी स्त्री `डॉ. आंबेडकर` सारख चित्रपटाच लेखन करते. सुमित्रा भावे, गुरिंदर चढ्ढा, यास्मिन, कबीर साहिरा शहा, अशांसारख्या अनेक स्त्रिया आपआपल्या समाजातील सुख दुख प्रभावीपणे चित्रपट वा लघुपटांतून मांडतात. सहजोसिंग सारखी स्त्री अन्वर जमाल या आपल्या पतीसह `स्वराज्य` हा ग्रामीण नेतृत्वावरील चित्रपट करते. जाग्या होणाऱ्या स्त्रियांचा पाण्याचा स्त्रोत शोधण्याचा व त्याला आपल्या गावाकडे वळवण्याचा संघर्ष जीवंत करते, गीता चावलासारखी स्त्री गुजरात दंगलीचं चित्रण करते. अशी अनेक क्षेत्र, त्यातील आव्हानांसह स्त्रियांना साद घालत आहेत. स्त्रियांच्या विस्तारणाऱ्या क्षितिजावर अनेक स्वयंप्रकाशी तारे उदयाला येतील.

**संदर्भ ग्रंथ :**

१) सकाळ अकरावा वर्धापन दिन अंक
२) राष्ट्रवादी मार्च २००३ अंक
३) स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ ह्याचे साहित्य
४) स्त्री अभ्यासाच्या दिशा - डॉ. सुनंदा ल. अहिरे
अथर्व पब्लिकेशन, जळगाव
५) भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान-शरयू अनंतराम, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई
६) भारतीय महिला एवं आधुनिकीकरण- मोजमील दक्षन आरजू
कॉमनवेल्थ पब्लिकेशन, दिल्ली